दै. प्रजावाणी दि. 16.03.25

# घरफोडी करणाऱ्या युवकाकडून सोन्याच्या दोन साखळ्या पाच अंगठ्या जप्त!

## आरोपीस अटक, एलसीबीची कारवाई

प्रतिनिधी • नांदेड

कॅनल रोड परिसरातील एका घराला कुलूप असल्याचे पाहून त्या घरात चोरी करून सोन्याच्या दोन साखळ्या व पाच अंगठ्या चोरून नेणाऱ्या एका घरफोड्यास एलसीबी पथकाने मुसक्या आवळल्या. घरफोडी करणाऱ्या त्या युवकाकडून चार लाख २८ हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. पुढील कारवाईसाठी आरोपीला भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

कॅनल रोड भागात उत्तमराव सोळंके राहतात. जानेवारी महिन्यात काही दिवसांसाठी ते घराला कुलूप लावून कुटुंबासहित बाहेर गावी गेले होते. घराला कुलूप असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने घर फोडून घरातील कपाटात ठेवलेल्या सोन्याच्या दोन साखळ्या व पाच अंगठ्यावर हात मारून पसार झाला. याप्रकरणी भाग्यनगर पोलीस स्थानकात घरफोडीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. दरम्यान, सदर गुन्ह्याचा तपास करत असताना मूळचा कळमनुरी तालुक्यातील कांडली गावाचा राहणारा परंतु, सध्या बऱ्याच दिवसांपासून चैतन्यनगर भागात राहणारा कपिल नवनाथ देशमुख यांच्यावर पोलिसांचा संशय बळावला. चोरीचे दागिने घेऊन बाजारात विकण्यासाठी जात असल्याची माहिती एलसीबीच्या पथकाला मिळाली पोलिसांनी चैतन्यनगर रोडवरील हरिओम नगरकडे जाणाऱ्या पाठीजवळ कपिल देशमुख याला सापळा रचून ताब्यात घेतले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ भोईर यांच्यासह कर्मचारी संदीप घोगरे, विलास कदम, बालाजी कदम, गणेश घुमाळ, तिरुपती तेलंग, राजू सिटीकर, घेवारे आदींनी केली.



### अंगझडतीत आढळले दागिणे

अंगझडतीत त्याच्याकडे सोन्याचे दागिने आढळून आले. याबाबत पोलिसांनी विचारणा केली असता कॅनल रोडवरील इ-स्केअरच्या पाठीमागे कारभारीनगर येथून दिवसा घरफोडी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपी कपिल नवनाथ देशमुख (वय ३१, राहणार कांडली, तालुका कळमनुरी) याच्या ताब्यातील सोन्याच्या दोन साखळ्या, पाच अंगठ्या असा एकूण चार लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.